रायगड जिल्ह्यात वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट, ज्यूसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादना साठी तालुका निहाय वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
-: संपर्क :-
विहा एन्टरप्रायजेस
9004563266
8888570393

दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com

● वर्ष १७ वे ● अंक १७८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२८ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# नवरात्रोत्सवात रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक वापरास सूट



## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या चर्चेतून वाढीव दिवसाचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

यंदाच्या नवरात्रोत्सवात १ ऑक्टोबर या दिवशीही उत्सवासाठी रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सूट देण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चेनंतर हा निर्णय घेतला आहे.

पर्यावरण व वातवरणीय बदल विभागाच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम, २०१७ अन्वये वर्षामध्ये एकूण १५ दिवस निश्चित करुन सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सूट जाहीर करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून १३ दिवस निश्चित करण्यात येतात. तसेच, २ दिवस हे जिल्ह्यातील स्थानिक परिस्थितीनुसार सूट देण्यासाठी राखीव ठेवण्यात येतात.

यावर्षी नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करता यावा यासाठी १ ऑक्टोबर, २०२२ रोजी नवरात्रोत्सवासाठी सकाळी सहा ते रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सूट देण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईमध्ये यंदाच्या नवरात्रोत्सवासाठी सोमवार, ३ ऑक्टोबर आणि मंगळवार, ४ ऑक्टोबर या व्यतिरिक्त शनिवार, १ ऑक्टोबर हा आणखी एक वाढीव दिवस उपलब्ध होणार आहे.

## जितक्या गरजा कमी तितके आयुष्य सुखी : शाहू पाटोळे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मानवी आयुष्य हे खूप सुंदर आहे. यात भौतिक सुखाच्या मागे न लागता जितक्या गरजा कमी तितके आयुष्य सुखी, हा सुखाचा मूलमंत्र पूर्वांचल राज्यातील लोकांची आयुष्य जगण्याची पद्धत अभ्यासली की मिळतो, असे प्रतिपादन लेखक तसेच पत्र सूचना कार्यालयाचे माजी अधिकारी शाहू पाटोळे यांनी आज येथे केले.

राजा राममोहन रॉय यांची पुण्यतिथी व जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग येथे प्रसारमाध्यम प्रतिनिधींसोबत अनौपचारिक संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कोकण विभागीय उपसंचालक डॉ.गणेश मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री.पाटोळे यांनी पूर्वांचल राज्यातील आपले अनुभव सांगताना तेथील समाज व्यवस्था, संस्कृती, राहणीमान, आहार-विहार, निसर्ग सौंदर्य, प्रशासकीय व्यवस्था, तेथील पत्रकारिता आदी विषयांबाबत उपस्थित प्रसारमाध्यम प्रतिनिधींना अगदी दिलखुलासपणे माहिती दिली. या संवादातून पूर्वांचल राज्याबद्दल अतिशय उपयुक्त माहिती मिळाल्याबाबत सर्वांनी आनंद व्यक्त केला.

सुरुवातीस उपसंचालक डॉ.मुळे यांनी उपस्थितांना शाहू पाटोळे यांच्या कार्याविषयीची माहिती दिली. तसेच उपस्थित प्रसारमाध्यम प्रतिनिधींचा परिचय करून दिला.

यावेळी उपस्थित मान्यवरांना जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी जिल्हा प्रशासनाचे विविध उपक्रम प्रतिबिंबित होणारे परिवर्तन कार्यपुस्तिकेचे तीनही अंक भेट दिले व शेवटी उपस्थित सर्वांचे आभार मानले.



## स्थानिक वस्तू आणि उत्पादनाप्रती अभिमान महत्वाचा : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्थानिक वस्तू आणि उत्पादनाप्रती अभिमान महत्वाचा आहे, त्या अनुषंगाने स्थानिक उत्पादनाचा प्रसार करा, असे आवाहन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (मंगळवार, दि. २७) येथे केले.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमे आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार जिल्ह्यातील स्थानिक उत्पादने व व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी 'व्होकल फॉर लोकल' शीर्षकाखाली दोन दिवसीय वस्तूंचे प्रदर्शन शहरातील गोखले सभागृहात करण्यात आले असून या शिबिराचे उदघाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, शहर अध्यक्ष जयंत पगडे, शहर सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहर महिला मोर्चा अध्यक्षा वर्षा नाईक, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, विकास घरत, माजी नगरसेविका नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, नीता माळी, वृषाली वाघमारे, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष मयुरेश नेतकर, खांदा कॉलनी महिला मोर्चा अध्यक्षा राखी पिंपळे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष रोहित जगताप, गौरव कांडपिळे, महिला मोर्चा शहर सरचिटणीस सपना पाटील, सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, महिला मोर्चा शहर उपाध्यक्षा सुहासिनी केकाणे, नीता मंजुळे, मयुरी उनटकर, आदिती मराठे, सोनाली पवार, सपना ठाकूर, अनिता रणदिवे, अंजली इनामदार, सोनाली सावंत, जेष्ठ नागरिक सेल शहर संयोजक उपेंद्र मराठे, रघुनाथ बहिरा, महेश सरदेसाई, चंद्रकांत मंजुळे, अप्पा शिंदे, अक्षय सिंग, शिवाजी भगत, यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

देशाला जगात ताकदवान बनविण्याचे काम करणारे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणासाठी वचनबद्ध आहे. ते अंत्योदयाचा संकल्प देत देशातील गोर-गरीब, शोषित व वंचित वर्गाच्या कल्याणाकरिता देशसेवेचे ध्येय साध्य करत विविध जनकल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी समर्पित भावनेने कार्यरत असतात. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्यावतीने दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर पर्यंत 'सेवात्मक',

.../२

## ब्रेक फेल! एसटी बसचा अपघात ; ७ जखमी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

एसटी बसेसच्या अपघाती घटनात दिवसेंदिवस वाढ होते. सुधागड तालुक्यातील महागाव फाट्यावर सेरेनिटी फॉर्महाऊस जवळ खेमवाडी पेण या एसटी बसचा ब्रेक फेल होऊन अपघात झाला.

हा अपघात मंगळवारी (ता.२७) सकाळी नऊ वाजताच्या सुमारास झाला. बसमध्ये १३ प्रवासी होते. त्यामधील ७ प्रवासी जखमी झाले असून सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. एसटी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या बसचा क्रमांक एम एच ०७ सी ७४८८ हा आहे. या अपघ-तातील जखमींना पाली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले आहे.



## संजय राऊतांचा दसराही कोठडीतच

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील १ हजार ०३४ कोटींच्या पत्राचाळ पुनर्विकासात झालेल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी शिव-सेना नेते आणि खासदार संजय राऊत यांचा आर्थर रोड जेलमधील मुक्काम वाढला आहे. सक्तवसुली संचलनालयाने संजय राऊत यांना पीएमएलए कायद्याअंतर्गत अटक केली. आताच्या घडीला संजय राऊत आर्थर रोड तुरुंगात असून, हा मुक्काम वाढला आहे. कारण संजय राऊत यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी १० ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

संजय राऊत सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. संजय राऊत यांनी जामीन मिळण्यासाठी अर्ज केला असून, यावरील सुनावणी विशेष पीएमएलए न्यायालयात सुरू आहे. पत्राचाळ आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संजय राऊतच मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप ईडीने केला आहे. या सुनावणीवेळी संजय राऊत हे न्यायालयात उपस्थित होते. यावेळी संजय राऊत यांच्या वकिलांचा युक्तिवाद पूर्ण झाला. यानंतर ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली.

## दोन दुचाकी स्वारांची समोरासमोर धडक ; 3 जखमी

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोहा कोलाड रस्त्यावर पंचरत्न अपार्टमेंट समोर रात्री भरधाव वेगाने जाणाऱ्या दोन दुचाकी स्वारांची समोरासमोर जोरदार धडक बसली.दरम्यान झालेल्या धडकेत तिघे जण गंभीररीत्या जखमी आहेत. मात्र या धडकेत दोन्ही दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

रोहा पोलसांकडून मिळालेल्या सविस्तर माहिती नुसार,२६ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजून ५० मिनिटांनी एक्सेल बाजूकडून ऋतिक गणेश पाटील(२२) आपला सहकारी अंकुर अनिल भोई हिरो रा.पडम हे होंडा कंपनीची स्पल्लेंडर क्र.एम एच ०६ पी.९९४५ घेऊन रोह्याकडे जात असताना रोहा बाजूकडून धाटावकडे येणाऱ्या यामाहा कंपनीची एफ.झेड. क्र. एम एच ०६ सी ए.०४६४ च्या अनिकेत गोविंद खामकर रा.घोसाळे हे चुकीच्या साइडला येऊन फिर्यादीच्या दुचाकीला जोरात धडक दिली.यात दोन्ही दुचाकी स्वारांची समोरासमोर जोरदार धडक बसल्याने मोठे नुकसान झाले आहे.

या तीघांना डॉ.भट हॉस्पिटल व डॉ जाधव यांच्या इस्पि-तळात प्राथमिक उपचारांसाठी आणले.यांच्यावर अधिक उपचार करण्यात आले. मात्र तिघेही जखमी असल्याचे सांगण्यात आले.या घटनेबाबत वृतिक् पाटील यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून रोहा पोलीस ठाण्यात मोटर

.../२

## ३.६५ कोटी रुपयांचे पाणी पुरवठा योजनेला प्रशासकीय मान्यता

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

खासदार सुनिल तटकरे आणि आमदार आदिती तटकरे यांचे विशेष प्रयत्नाने जलजिवन मिशन योजने अंतर्गत म्हसळा तालुक्यातील छोट्या मोठ्या लोकवस्ती असलेल्या गाववाडी वस्तीसाठी मोठ मोठ्या निधीची मंजुरी मिळविण्यात यश प्राप्त केले आसुन खासदार तटकरे यांनी तोंडसुरे, खरसई, मेंदडीकोंड पाठोपाठ पाभरे ग्रुप ग्राम पंचायती मधील पाच समाजाचे मोठी लोकवस्ती असलेल्या पाभरे गावासाठी पाभरे धरणाचे स्त्रोता मधुन तब्बल २.८७ कोटी रुपयांची आणि रोहिणी गावासाठी ७८ लक्ष रुपये मिळुन ३.६५ कोटी रुपयांचे स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजनेला मंजुरी मिळवुन दिली आहे.



या विभागातील तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेसाठी १०.३३ कोटी, खरसईसाठी १.९७ कोटी, मेंदडीकोंड १.१२ कोटी पाठोपाठ पाभरे आणि रोहिणी गावासाठी ३.६५ कोटी रुपयांचे पाणी पुरवठा योजनाना मंजुरी मिळवुन दिली असल्याने म्हसळा तालुक्यातील जनतेचा आनंद द्विगुणित झाला आहे. धरण उशाला आणि कोरड घशालाअशीच अवस्था वरील गावांसह पाभरे गाव आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांची पाणी टंचाई काळात होत असते असे असताना खासदार सुनिल तटकरे यांनी पाभरेकरांना मंजुर नळ पाणी पुरवठा योजनेचे प्रशासकीय मान्यता पत्र सुपुर्द करुन खऱ्या अर्थाने भविष्यातील पाणी टंचाई कायम मुक्त करुन दिली आहे.

मौजे सुतारवाडी येथील कार्यालयात शासन मंजुर योजनेचे प्रशासकीय मान्यता पत्र पाभरे आणि रोहिणी ग्रामस्थांकडे सुपुर्द केले या वेळी त्यांचे समावेत आमदार आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा चिटणीस महादेव पाटील,

.../२

## मोटार सायकलचा अपघात; दोन गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली खोपोली राज्य महामार्गावर चिवे गावाचे कमानी जवळ मोटारसायकलचा जोरदार अपघात झाला असून या अपघातात मोटारसायकलवरील खवली येथील दोघे तरुण गंभीर जखमी झाले आहेत.

पाली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पाली खोपोली राज्य महामार्गावर चिवे गावाचे कमानी जवळ पिकअप जीप क्रमांक एम एच १४ एच जी ९४ ३१ हे वाहन चालक शांताराम नारायण शेळके हे खोपोली पाली रोडने खोपोली बाजूकडे चिवे गावाच्या हद्दीत कमानी जवळ आले असता चिवे गावाकडून येणारी एक मोटार सायकल

.../२



# माणगाव तालुक्यातील शिरवली ग्रामपंचायतमधील टिटवे गाव स्वप्नातील गाव म्हणून घोषित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वदेस फाऊंडेशन व गावविकास समिती व महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वप्ना-तील गाव कार्यक्रम खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२२ सप्टेंबर २०२२ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात टिटवे गाव स्वप्नातील गाव म्हणून घोषित करण्यात आले.

स्वच्छ, सुंदर,स्वस्थ, आत्मनिर्भर व आदर्श गाव विकास समिती ही पाच मापदंडे व ६२ कामांच्या ७०% कामे पूर्ण करून गावाने स्वप्नातील गावाचा दर्जा पटकाविला. शासन व स्वदेस फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून तसेच श्रमदान व लोकसहभागातून टिटवे गा-वाने उत्कृष्ट कार्य केले व स्वप्नातील गाव या संकल्पनेकडे वाटचाल सुरू केली.

या कार्यक्रमात खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते गावाला आदर्श व स्वप्नातील गाव प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. ग्रामस्थांनी व महिलांना एकाच रंगातील वेशभूषा परिधान करून ढोल-ताशांच्या गजरात लेझीम खेळत आलेल्या पाहुण्यांच्या सन्मानार्थ मिरवणूक काढली.



उत्कृष्ट रांगोळी, बोलक्या भिंतींनी गाव सजविण्यात आले होते. भारत माता की जय, वंदे मातरम, स्व से बने देस, स्वदेस च्या घो-षणा देत स्वप्नातील गाव फलकाचे अनावरण व गावाने लोकसहभागातून उभ्या केलेल्या गजरात कमानीची फित कापून गावकऱ्यांना जल्लोष साजरा केला.

मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून निसर्ग संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. फटाकेमुक्त उत्सव व ढोल ताशांच्या गजरात पर्यावरण संतुलनाचा संदेश दिला. यावेळी बाबूशेठ खानविलकर, स्वदेस फाऊंडेशन चे संचालक श्री.प्रदीप साठे व व राहुल कटारिया वरिष्ठ व्यवस्थापक विकास खरमाळे, व्यवस्थापक मेघना फडके, सहव्यवस्थापक भीमराव भालेराव, संकेत आहेर, सतीश भोसले, अमित गुप्ता, सरपंच, उपअभियंता श्री.बारापत्रे, शिरवली ग्रामपंचायत सरपंच सुमन काटकर, जिते ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेविका मयुरी पवार, मंडळ अधिकारी जितेंद्र टेम्बे, तलाठी सौ.गुणवंती वाघ, मुख्याध्यापक अनिल पावरा, श्री.अंकुश गोळे, पोलीस पाटील राजेंद्र सावंत, चंद्रकांत पवार, लक्ष्मण म्हाळुंगे, भागोजी भद्रिके, ग्रामविकास समिती अध्यक्ष अशोक गायकवाड, उपाध्यक्ष सखाराम मोरे, सचिव अनिशा दामुगडे, अर्चना अंबिके, सारिका गावस्कर व सदस्य व सुनील पवार, हिरामण गायकवाड, मनोज कदम, अनिल मोरे, सुरेंद्र पालांडे, स्वदेस चे वरिष्ठ समन्वयक चांगदेव सानप आदी उपस्थित होते.

# १६ ऑक्टोबर रोजी खेरणे ग्रामपंचायतसाठी निवडणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील खेरणे ग्रामपंचायतसाठी १६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान होणार आहे. तर १७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे.

पनवेल तालुक्यातील एकमेव खेरणे ग्रामपंचायतसाठी महाविकास आघाडी विरुद्ध भाजपा अशी लढत होत आहे. महाविकास आघाडीमध्ये शेकाप, शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस आणि मनसे असे पक्ष एकत्र आले आहेत. तर त्यांच्याविरोधात भाजप लढत आहे. या ग्रामपंचायतमध्ये ११ सदस्य संख्यासाठी निवडणूक होत आहे. नामनिर्देशन पत्र छाननी करण्याचा दिनांक २८ सप्टेंबर आहे. तर नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक ३० सप्टेंबर आहे. निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरीत्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक ३० सप्टेंबर आहे.

# मराठी प्राथमिक विद्यालयात राष्ट्रीय पोषण आहार दिन साजरा



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयात राष्ट्रीय पोषण आहार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध अन्नधान्य, कडधान्य, फळभाज्या, तसेच पोषक जीवनसत्व बाबत माहिती विशद केली. पोषण आहार याबाबत माहिती घेऊन विविध पक्वानांचा स्वाद घेऊन राष्ट्रीय पोषण आहार दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कल्पकतेतून पालेभाज्या फळभाज्या कडधान्य यातून विविध कलाकृतीही सादर करून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांचे कडून शाबासकीची थाप मिळवली. राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शालेय पोषण आहार अंतर्गत सप्टेंबर महिना हा राष्ट्रीय पोषण माह म्हणून राज्यभर साजरा केला जातो. त्यानिमित्ताने विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विविध पालेभाज्या कडधान्य फळभाज्या वापरून तिरंगा थाळी साकारली होती. तर विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पकतेतून विविध प्राणी पक्षी यांच्या कलाकृतीही सादर केल्या होत्या.यासाठी विद्यार्थ्यांनी घरून विविध पोषक पदार्थ बनवून आणले होते. तसेच पोषक पदार्थ दाखविणाऱ्या रांगोळ्या व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. राष्ट्रीय पोषण आहार जल्लोषात साजरा करण्यासाठी विद्यालयातील सर्व सहाय्यक शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# कर्जत तालुक्यातील २ ग्रामपंचायतीच्या निवडणूका जाहीर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जून २०२२ ते सप्टेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका १३ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आल्या होत्या, मात्र या निवडणुका दोन दिवस पुढे ढकलण्यात आल्या आहेत, काल दि.२६ सप्टेंबर रोजी रात्री निवडणूक आयोगाकडून उशिरा आलेल्या फॅक्स मध्ये या निवडणुका १६ ऑक्टोबर रोजी घेण्यात याव्यात अश्या सूचना करण्यात आल्या आहेत, त्यामुळे निवडणूक मतमोजणी १७ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

कर्जत तालुक्यातील पोटल आणि पाली या दोन ग्रामपंचायतीसाठी दि.१६ ऑक्टोबर रोजी निवडणूक घेण्यात येणार आहे, त्यासाठी बुधवार दि.२१ सप्टेंबर ते मंगळवार दि.२७ सप्टेंबर पर्यंत नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची मुदत होती.

आज दि.२७ सप्टेंबर शेवटच्या दिवशी पोटल ग्रामपंचायत मधील ९ सदस्या साठी ३१ नामनिर्देशनपत्रे दाखल झाली आहेत तर सरपंच पदासाठी ५ नामनिर्देशनपत्रे दाखल झाली आहेत. पाली ग्रामपंचायत मधील ७ सदस्यांसाठी ७ नामनिर्देशनपत्रे दाखल झाली आहेत तर सरपंच पदासाठी १ नामनिर्देशनपत्र दाखल झाले आहे, त्यामुळे पाली ग्रामपंचायत बिनविरोध झाली आहे, मात्र ३० सप्टेंबर नंतर याची अधिकृत घोषणा करण्यात येईल अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अभिजित खैरे यांनी दिली.

# उरणच्या कोकण ज्ञानपीठ येथील रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

टाटा हॉस्पिटल व खारघर ब्लड बँक यांच्या सहकार्याने कोकण ज्ञानपीठ, उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, लायन्स क्लब उरण, मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक संस्था उरण, माजी विद्यार्थी संघ, उरण महाविद्यालय,श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था उरण, वूमन ऑफ विसडम शैक्षणिक व सामाजिक संस्था उरण तसेच टायगर ग्रुप उरण यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण ज्ञानपीठ, उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, तहसिल कार्यालय समोर, उरण शहर येथे काल २७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून एकूण ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले .दरवर्षी महाविद्यालयाच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. या वर्षीही रक्तदान शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयाचे प्राचार्य बळीराम गायकवाड, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर, लायन्स क्लब उरणचे अध्यक्ष सदानंद गायकवाड, वूमन ऑफ विसडम उरण या संस्थेच्या अध्यक्षा सारिका पाटील,श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, टायगर ग्रुप उरणचे अध्यक्ष आकाश जोशी,कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरणचे प्राध्यापक वर्ग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी , टाटा हॉस्पीटल व खारघर रक्तपेढीचे अधिकारी कर्मचारी वर्ग, मान्यवर व नागरिक यावेळी उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

आरटीएस वि.मा.अर्ज क्र.१०/२०२२

प्रति,

१) कृष्णा बापू शेळके
रा.शिवम को.ऑप.हौसिंग सोसायटी,
बी विंग, तिसरा मजला, नेरुळ, सेक्टर ६
नवी मुंबई ४००७०६ अपिलार्थी

विरुद्ध

सोहम बिल्टटेक तर्फे भागीदार म्हणून
१) उपेंद्र एम. पटेल
रा.एम्पायर इस्टेट, फ्लॅट नंबर ११०२,
बी विंग, फ्लॅट नंबर ४१/४२, सेक्टर-२० खारघर
२) सुभाष व्ही. पटेल / चौहान
रा.बी विंग, ६०१, शुभारंभ कॉलनी
फ्लॅट नंबर १९, सेक्टर २०, खारघर सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : डिकसळ, ता.कर्जत, जि.रायगड येथील फेरफार क्र.१२७८ चे नोंदी विरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दि.२९/०३/२०२२ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुना-वणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.२८/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सर्व सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे : डिकसळ, ता.कर्जत, जि.रायगड | २ | ८/अ/१ | ०-२८-६० | १-२५ |
| | २ | ८/अ/२ | ०-०४-५० | ०-०२ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २०/०९/२०२२

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जतकरिता**

---

मा.गोडसे साो यांचे कोर्टात

प्रो.जमा. ६-२५

अर्जदारांचे वकील
ॲड.सचिन केशव शिंदे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३७४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/११/२०२२

१) श्रीमती.मेरी इनासू करयामपरंबेन
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.जिणतो इनासू करयापरंबेन
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.जीवन इनासू करयापरंबेन
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्र.१ ते ३ रा.सदनिका क्र.अ/३०५,
ई.व्ही.रिजेन्सी, कार्मेल हायस्कूल समोर,
सेक्टर नं.११, प्लॉट नं.२२,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी मयत श्री.इनासू देवसी करयामपरंबेन हे दि.०१/०९/२०१९ रोजी करयांम्परंबेन हाऊस, कन्नांमाथुर, चेंगुलर पी ओ, थिस्सुर, केरला, पिन ६८०३१२ येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर ११, प्लॉट क्र.२२ मध्ये बांधण्यात आलेली बिल्डींग, ''ई. व्ही.रिजेन्सी'' मधील ''अे'' विंगच्या ३ या, मजल्यावरील, सदनिका क्र.३०४, क्षेत्र ५५.३३ चौ.मी.ची बांधीव मिळकत व टेरेस २.३२ चौ.मी.**

मयत श्री.इनासू देवसी करयामपरंबेन यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज या मे.न्यायालयात दाखल केला आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मे.न्यायालयात सादरकराव्यात.

जर सदरहू मुदतीत कोणतीही हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून सदरहू मे.न्यायालय अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित झाल्यास त्यांना सदरहू मयत श्री.इनासू देवसी करयामपरंबेन यांचे वारस घोषित करून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दि.२७/०९/२०२२ रोजी मे.न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.पठारे साहेब यांचे कोर्ट

ॲड.राजकुमार व्ही. जाधव
अर्जदाराचे वकील

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/११/२०२२

कै.गजानन कृष्णा घरत व
कै.शकुंतला गजानन घरत मयतचे वारस
१) श्री.दत्ताराम रामचंद्र घरत
वय : ६६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.जिजामाता चाळ, आकुर्ली, रोड हनुमान नगर,
कांदिवली, पुर्व मुंबई महाराष्ट्र ४०००01
२) श्री.अशोक रामचंद्र घरत
वय : ६४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.१ अनुसया अपार्टमेंट, नागाव, ता.उरण, जि.रायगड
३) श्री.गणेश रामचंद्र घरत
वय : ६२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.श्री.राम समर्थ अपार्टमेंट, नागाव रोड,
पोलीस लाईन जवळ, फ्लॅट नं.बी/२०४,
दुसरा मजला, मातवली, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.गजानन कृष्णा घरत व कै.शकुंतला गजानन घरत यांचेमध्ये चुलता व पुतणे असे नाते संबंध आहेत. कै.गजानन कृष्णा घरत ह्यांचे निधन दि.०९/०८/१९९९ रोजी मु.नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले असून कै.गजानन कृष्णा घरत यांची पत्नी कै.शकुंतला गजानन घरत यांचे निधन दि.०१/११/२०१४ रोजी मु.नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेले असून श्री.दत्ताराम रामचंद्र घरत व इतर २ ह्यांनी कै.गजानन कृष्णा घरत व कै.शकुंतला गजानन घरत यांच्या मालकीची सह हिस्सेदारा समवेत खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड

| अ.क्र. | युनिट केस नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३९१ ए | ११९ | ११ | ०-०४-१२ | ०.६२ |
| २ | ३९१ बी | १४२ | २ | ०-९-८ | ०.४४ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.गजानन कृष्णा घरत व कै.शकुंतला गजानन घरत यांना भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्री.दत्ताराम रामचंद्र घरत व इतर २ कै.गजानन कृष्णा घरत व कै.शकुंतला गजानन घरत यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री.दत्ताराम रामचंद्र घरत व इतर २ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.गजानन कृष्णा घरत व कै. शकुंतला गजानन घरत यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२६/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

---

मे.एन.एम.वाली साहेब यांचे कोर्ट

ॲड.राजकुमार व्ही. जाधव
अर्जदाराचे वकील

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/१२/२०२२

कै.लिलाबाई मनोहर म्हात्रे मयतचे वारस
१) श्री.निलेश मनोहर म्हात्रे
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ओल्ड ग्रामपंचायत ऑफिस,
२२ ए/बी फुंडे, ता.उरण, जि.रायगड
२) श्री.संजय मनोहर म्हात्रे
वय : वर्षे, धंदा : नोकरी
रा.८९, फुंडे, ता.उरण, जि.रायगड
३) श्री.मिलींद मनोहर म्हात्रे
वय : वर्षे, धंदा : नोकरी
रा.८९, फुंडे, ता.उरण, जि.रायगड
४) सौ.संगीता मनोहर म्हात्रे
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
५) सौ.दिपीका दिपक घरत पुर्वाश्रमीचे नाव
दिपीका मनोहर म्हात्रे
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नागांव रोड, बापूशेठ वाडी,
रुम नं.२०१, ए-विंग, गुरुमाऊली अपार्टमेंट,
बापूशेठ वाडी, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.लिलाबाई मनोहर म्हात्रे यांची मुले असून अर्जदार क्र.४ व ५ ह्या मुली आहेत. कै.लिलाबाई मनोहर म्हात्रे ह्यांचे निधन दि.१५/११/२०२० रोजी मु.फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले असून कै. लिलाबाई मनोहर म्हात्रे यांचे पती कै.मनोहर परशुराम म्हात्रे यांचे निधन दि.०३/०६/१९९४ रोजी मु.फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेले असून श्री.निलेश मनोहर म्हात्रे व इतर ४ ह्यांनी कै.लिलाबाई मनोहर म्हात्रे यांच्या मालकीची सह सहहिस्सेदारा समवेत खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| अनु क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | फुंडे ९५ ए/१५४ | ५ | १६ | ०-१-० |
| २ | | १६ | १८ | ०-५-१ |
| ३ | | २० | ९ | ०-२-८ |
| ४ | | २३ | ५ | ०-३-० |
| ५ | | १०८ | ५ | ०-३-८ |
| ६ | | १०९ | ९ | ०-३-८ |
| ७ | | १०९ | ३१ | ०-०-८ |
| ८ | | ११० | १ | ०-३-८ |
| ९ | | १११ | १९ | ०-९-८ |
| १० | | ११४ | ६ | ०-१-३ |
| ११ | | १२३ | १४ | ०-४-० |
| १२ | | १५३ | ११ | ०-२-५ |
| १३ | | १५४ | ४ | ०-४-० |
| १४ | फुंडे ९५ बी/२३७ | ११ | १५ | ०-६-६ |
| १५ | | १२ | ८ | ०-७-६ |
| १६ | | १७ | १४ | ०-४-३ |
| १७ | | ११७ | १८ | ०-४-३ |
| १८ | | १४६ | ८ | ०-८-८ |
| १९ | | १३८ | ४ | ०-९-० |
| २० | फुंडे १०१+ १६०/४९७ | ३६ | ८ | ०-५-६ |
| २१ | | ४१ | १० | ०-७-० |
| २२ | | ४९ | २५ | ०-१-३ |
| २३ | | ५३ | ४ | ०-५-६ |
| २४ | | ५४ | ९ | ०-८-२ |
| २५ | | ६४ | ८ | ०-६-१ |
| २६ | | ६९ | ९ | ०-४-८ |
| २७ | | १२१ | १ | ०-४-० |
| २८ | | १२७ | १० | ०-६-० |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.लिलाबाई मनोहर म्हात्रे यांना भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्री.निलेश मनोहर म्हात्रे व इतर ४ हे कै.लिलाबाई मनोहर म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री.निलेश मनोहर म्हात्रे व इतर ४ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.लिलाबाई मनोहर म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२७/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

